follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

सातारा दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २५२ ✻ सातारा ✻ शनिवार ✻ दि. २५ मे २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

## ब्राह्मण-बनिया समाजातही गरीब लोक, त्यांना आरक्षण मिळू नये का?

### मोदींचा काँग्रेसवर घणाघात



**शिमला :** लोकसभा निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे, त्यामुळे सर्वच पक्षांनी प्रचाराचा जोरही वाढवला आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिमाचल प्रदेशची राजधानी शिमला येथे जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी सवर्ण समाजातील गरिबांना मिळणाऱ्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन काँग्रेसवर जोरदार टीका केली. तसेच,काँग्रेसने कधीच त्यांच्याकडे लक्ष दिले नसल्याचा आरोपही केला.

भाजपने सवर्ण गरिबांना आरक्षण दिलेपंतप्रधान मोदी म्हणाले की, ब्राह्मण आणि बनिया समाजातदेखील अनेक गरीब आहेत. त्यांच्या मुलांना आरक्षण मिळू नये का? काँग्रेसने याकडे कधीच लक्ष दिले नाही. पण, आमच्या सरकारने गरीब सवर्ण कुटुंबातील मुलांना १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसला तर ओबीसी आरक्षण संपवून मुस्लिमांना द्यायचे आहे. कर्नाटकात काँग्रेसने हेच केले. काँग्रेस आणिइंडिया आघाडीलाहे आता संपूर्ण देशात लागू करायचे आहे. मात्र, आमच्या सरकारमध्ये असे कधीच होऊ शकत नाही. दलित आणि मागास वर्गीयांचे हक्क हिरावून घेऊ देणार नाही, अशी टीका मोदींनी केली.ओबीसींचे हक्क हिसकावून घेण्याचे षड्यंत्र

ते पुढे म्हणतात, ओबीसी आरक्षण कमी करण्याचे ताजे उदाहरण पश्चिम बंगालमध्ये समोर आले आहे. तेथील सरकारने राज्यातील ७७ मुस्लिम जातींना ओबीसी प्रमाणपत्र दिले. पण, दोनच दिवसांपूर्वी कोलकाता उच्च न्यायालयाने ते आरक्षण रद्द केले. ओबीसींचे अधिकार लुटून संविधानाची चिरफाड करणे, हेइंडिया आघाडीचेकाम आहे. संविधान आणि न्यायालयामुळे त्यांना तसे करता येत नाही, म्हणून त्यांच्यासाठी आता व्होट बँक महत्त्वाची आहे, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.देशाच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरुन काँग्रेसला घेरलं

हिमाचल प्रदेश हे सीमेला लागून असलेले राज्य आहे. हिमाचलच्या लोकांना मजबूत आणि शक्तिशाली सरकारचा अर्थ माहीत आहे. तुमच्यासाठी मी स्वतःचा जीव धोक्यात घालेन, पण तुम्हाला कधीही त्रास होऊ देणार नाहीत. तुम्ही काँग्रेसचा काळ पाहिला आहे. जेव्हा देशात कमकुवत सरकार होते, त्यावेळी पाकिस्तान आमच्या डोक्यावर नाचायचा. कमकुवत काँग्रेस सरकार जगभर विनवणी करत फिरायचे. भारत मातेचा अपमान मी सहन करू शकत नाही, पण काँग्रेस भारत मातेचा अपमान करणंही सोडत नाही. काँग्रेसला भारत माता की जय म्हणण्यात अडचण आहे. त्यांना वंदे मातरम् म्हणण्यात अडचण आहे. पण आता भारत यापुढे जगाकडे भीक मागणार नाही, स्वतःची लढाई स्वबळावर लढेल आणि भारत त्यांना घरात घुसून मारेल, असंही मोदी यावेळी म्हणाले. हे देशाचे भविष्य...फक्त पूर्वजांच्या नावावर जगणारे हा देश घडवू शकत नाहीत. हा देश त्यांच्यामुळे विकसित होईल, ज्यांनी जमिनीवरुन उठून डोंगराएवढी उंची गाठली आहे. स्टार्टअप सुरू करणारे, आपला सॅटेलाईट अवकाशात पाठवणारे, शेतात ड्रोन उडवणाऱ्या मुली, फायटर प्लेन उडवणाऱ्या तरुणी भारताचे भविष्य आहेत. देशातील महिलांबद्दल काँग्रेसचे काय विचार आहेत, हे सर्व देशाने पाहिले आहे. मंडीचे नाव घेऊन काँग्रेसने कंगनाबद्दल ज्या गोष्टी बोलल्या, त्या अतिशय खालच्या स्तराचा आहेत.काँग्रेसला असा भारत आवडतो, जिथे...मी समान नागरी कायदा करण्याचे वचन दिले आहे. भारताचा नागरिक, मग तो हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन किंवा बौद्ध असो, त्यांच्यासाठी समान नागरी कायदे असले पाहिजेत. मात्र काँग्रेस समान नागरी संहितेला विरोध करत आहे.

मुस्लिम पर्सनल लॉच्या नावाखाली काँग्रेस शरियाचे समर्थन करते. तुम्ही अनेक दशकांपासून काँग्रेसची सत्ता पाहिली आहे. काँग्रेसला असा भारत आवडतो, जिथे नागरिक गरिबी, संकट आणि समस्यांनी वेढलेले असतात. म्हणूनच त्यांना देशातील जुनी परिस्थिती परत आणायची आहे. त्यांना देशाच्या विकासात रिव्हर्स गियर लावायचा आहे. काँग्रेस म्हणते की, आम्ही सत्तेत आलो तर ३७० परत आणू, उ-- रद्द करू, देशाची अण्वस्त्रे संपवू. पण हा मोदी असेपर्यंत काँग्रेसचे मनसूबे पूर्ण होऊ शकणार नाहीत, असा इशाराही त्यांनी यावेळी दिल्या.

## विधानपरिषदेच्या चार जागांसाठी २६ जूनला निवडणूक

**मुंबई :** राज्यातील लोकसभा निवडणुका संपल्यानंतर आता विधान परिषद निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. विधान परिषदेच्या ४ जागांसाठीच्या निवडणूक कार्यक्रमाची नव्याने घोषणा करण्यात आली असून दोन शिक्षक आणि दोन पदवीधर जागांसाठी पुढील महिन्यात २६ जून रोजी मतदान होणार आहे. मुंबई , कोकण पदवीधर मतदार संघ , नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदार संघात ही निवडणूक होणार आहे.

विधान परिषदेच्या ४ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत २ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघांचा समावेश आहे. मुंबई पदवीधर मतदार संघातून संजय पोतनीस तर कोकण पदवीधर मतदार संघातून निरंजन डावखरे यांची मुदत ७ जुलै रोजी संपत आहे. तसेच, मुंबई शिक्षक मतदार संघातून कपिल पाटील आणि नाशिक शिक्षक मतदार संघातून किशोर दराडे यांचीही मुदत संपत आहे. त्यामुळे आता विधान परिषदेच्या या चारही जागांसाठी निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून नवीन कार्यक्रमानुसार पुढील महिन्यात २६ जून रोजी मतदान होणार आहे आणि १ जुलै रोजी मतमोजणी होणार आहे.

विधान परिषदेच्या ४ जागांसाठी ३१ मे ते ७ जून पर्यंत उमेदवारांना अर्ज भरता येणार आहे. यानंतर १० जून रोजी उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी होईल आणि १२ जूनपर्यंत उमेदवारांना त्यांचा अर्ज मागे घेता येईल. यानंतर २६ जून रोजी मतदान होणार असून १ जुलै रोजी मतमोजणी होणार आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकांसाठी याआधी १० जून रोजी तारीख निश्चित करण्यात आली होती.

मात्र सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या असल्याने १० जून रोजी राज्यातील बहुतांश सर्वच शाळा आणि शिक्षकांना सुट्टी आहे. त्यामुळे मतदानावर त्याचा परिणाम पडू शकतो, असा दावा करत ही निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून होत होती. निवडणूक आयोगाने शिक्षक संघटनांची ही मागणी मान्य करत विधान परिषदेच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या होत्या. पण आता निवडणूक आयोगाने नव्याने विधानपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

### विजय वडेट्टीवार यांनी दुष्काळावरून सरकारला सुनावले

**मुंबई :** राज्यात एकीकडे अवकाळी पाऊस तर दुसरीकडे दुष्काळ अशी परिस्थिती आहे.त्यामुळे आता सरकारने जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी करत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, संपूर्ण राज्य दुष्काळाने होरपळत आहे.भीषण पाणटंचाई आहे त्यामुळे शेतकरी असो की सामान्य जनता त्रस्त आहे. अवकाळी पाऊस झालेल्या ठिकाणी अजूनही पंचनामे करण्यात आलेले नाही. राज्य सरकारने पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी. वडेट्टीवार यासंदर्भात बोलताना म्हणाले की, दुष्काळी भागात चारा छावण्या, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सरकारने करावी. टँकर राज्यात सुरु असेल तरी राज्यातील पाणीसाठा इतका कमी आहे की येणाऱ्या दिवसात टँकर देण्यासाठी पाणी उपलब्ध असेल का हा प्रश्न आहेत.

लोकसभा निवडणुकीमुळे शासन व प्रशासन निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिले आता राज्यातील निवडणूक कार्यक्रम संपला आहे. राज्य सरकारने तातडीने पाणी व चाऱ्याची सोय करण्याकडे लक्ष द्यावे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

## नर्मदा बचाओ आंदोलनाच्या प्रमुख मेधा पाटकर २० वर्षे जुन्या मानहानीच्या प्रकरणात दोषी



सामाजिक कार्यकर्त्या आणि नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्यामेधा पाटकरयांना मोठा झटका बसला आहे. दिल्लीच्या साकेत न्यायालयाने शुक्रवारी (२४ मे) २० वर्षे जुन्या मानहानीच्या प्रकरणात त्यांना दोषी ठरवले आहे. तत्कालीन KVIC चेअरमन व्हीके सक्सेना (आता दिल्लीचे नायब राज्यपाल) यांनी पाटकरांविरोधात याचिका दाखल केली होती

साकेत न्यायालयाचे मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट राघव शर्मा यांनी पाटकर यांना मानहानीप्रकरणी दोषी ठरवले. कायद्यानुसार त्यांना दोन वर्षे तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही होऊ शकतात. मेधा पाटकर यांनी स्वतः आणि नर्मदा बचाव आंदोलन विरोधात जाहिराती प्रकाशित केल्याबद्दल व्हीके सक्सेना यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. पाटकर आणि दिल्लीचे एलजी, २००० सालापासून ही कायदेशीर लढाई लढत आहेत.न्यायालयाने काय म्हटले?

मेधा पाटकर यांना दोषी ठरवताना साकेत न्यायालयाने म्हटले की, तक्रारदारचे भ्याड, देशविरोधी आणि हवाला व्यवहारात सहभागी असल्याचे आरोप केवळ बदनामीकारकच नव्हते, तर ते नकारात्मकता पसरवण्यासाठी तयार करण्यात आले होते.

**काय आहे प्रकरण ?**

हा मानहानीचा खटला २००३ चा आहे. दिल्लीचे विद्यमान नायब राज्यपाल व्हीके सक्सेना, हे त्यावेळी अहमदाबादस्थित एनजीओ नॅशनल कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टीजचे प्रमुख होते. एका टीव्ही चॅनलवर आपल्याविरुद्ध अपमानास्पद टिप्पणी करणे आणि बदनामीकारक प्रेस स्टेटमेंट जारी केल्याबद्दल सक्सेना यांनी मेधा पाटकरांविरोधात दोन गुन्हे दाखल केले होते.

## गेल इंडिया या पेट्रोकेमिकल्स कंपनीच्या प्रकल्पावरून सरकारला धरले धारेवर



**मुंबई :** ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेला गेल इंडिया या पेट्रोकेमिकल्स कंपनीचा प्रकल्प महाराष्ट्रातून भाजपची सत्ता असलेल्या मध्य प्रदेशात गेला आहे. यावरून विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला सवाल करत धारेवर धरले आहे.

वडेट्टीवार यांनी ट्विट करून सरकारवर निशाणा साधला. आधी महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला पळवण्यात आले, आता मध्य प्रदेशमध्ये प्रकल्प पळवण्यात आला आहे. महाराष्ट्रावर भाजपाची आगपाखड का असा सवाल यानिमित्ताने निर्माण होत आहे.

महाराष्ट्रातील उद्योग इतर राज्यात पळवले जात असताना शिंदे सरकार काय करत आहे ?असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

## डोंबिवलीतील धोकादायक कारखाने महाभ्रष्टयुती सरकारने पैसे घेऊन सुरु ठेवले

### नाना पटोले यांचा गंभीर आरोप



**मुंबई :** डोंबिवलीत रासायनिक कारखान्यात स्फोट होऊन ११ लोकांचा मृत्यू झाला व ६० जण जखमी झाले. डोंबवलीत यापूर्वी झालेल्या एका घटनेनंतर महाविकास आघाडी सरकारने हे कारखाने बंद करण्याचे आदेश दिले होते पण त्यानंतर आलेल्या महाभ्रष्ट युती सरकारने पैसे घेऊन ते कारखाने सुरुच ठेवले. लोकांच्या जिविताचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे पण खोके सरकारला गरिबांच्या जीवाचे मोल नाही, जनाची नाही मनाची असेल तर शिंदे-भाजपा सरकारने राजीनामा देऊन मोकळे व्हावे, असे नाना पटोले म्हणाले.

नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यातील सरकार हे असंवैधानिक आहे, या सरकारला सर्वसामान्य जनतेचे काहीही देणेघेणे नाही. गरीब लोकांचे जीव जात आहेत पण त्याकडे सरकारचे लक्ष नाही. दुष्काळाने जनता होरपळत आहे पण सरकार काहीही उपाययोजना करत नाही. पुण्यात धनदांडग्याच्या मुलाने गरिबाच्या दोघांना चिरडले तर निबंध लिहून त्याला सोडून दिले.

राज्यात दुष्काळाची स्थिती अत्यंत गंभीर आहे, काही गावांना महिना महिना पाणी मिळत नाही, जनावरांना चारा नाही, पिण्याचे पाणी नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये दुष्काळ आढावा बैठक घेतली पण या बैठकीला ५ पालकमंत्री गैरहजर होते यातूनच सरकार दुष्काळावर गंभीर नाही हे स्पष्ट दिसते. मुख्यमंत्र्यांनी जागेवरच आदेश द्यायला पाहिजे होते पण केवळ बैठकीचा सोपस्कार पूर्ण केला. सरकारने आचार संहितेचे बहाणे करुन टाळाटाळ करू नये, तातडीने जनावरांना चारा, पिण्याचे पाणी व लोकांच्या हाताला काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी पटोले यांनी केली आहे

नवीन अभ्यासक्रमासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, अभ्यासक्रमात जर मनुस्मृतीचा समावेश केला तर ते अजिबात चालणार नाही, काँग्रेस ते कदापी खपवून घेणार नाही. सर्व तपासून यासंदर्भात पुढची पाऊले उचलू, असे नाना पटोले म्हणाले.

## थोडी जरी नैतिकता असेल तर राजीनामा द्या

### रोहित पवारांचा फडणवीस, अजितदादांवर हल्लाबोल



**पुणे :** पुण्यातील कल्याणीनगर इथं झालेल्या अपघाताचे मागील काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणावरही पडसाद उमटत आहेत. अपघात प्रकरणातील आरोपीला वाचवण्यासाठी स्थानिक आमदार आणि पोलीस प्रशासनाने प्रयत्न केल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी पुण्यात येत आरोपींवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं स्पष्ट केल्यानंतरही सरकावर होणारी टीका थांबली नसून आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी फडणवीस यांच्यासह राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही जोरदार निशाणा साधला आहे.

रोहित पवारयांनी एक्सवर पोस्ट लिहीत म्हटलं आहे की, देवेंद्र फडणवीससाहेब, तुम्ही म्हणाला होतात की, गाडीखाली कुत्रं आलं तरी विरोधक राजीनामा मागतील. गृहमंत्री महोदय. गाडीखाली कुत्रं नाही तर जीवंत माणसं चिरडली जात आहेत.

रस्त्याने चालणारा सामान्य माणूस सुरक्षित नाही. भर दिवसा इंदापूर तहसीलदारावर हल्ला झाल्याने अधिकारीही सुरक्षित नाही. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक नाही आणि पुण्याच्या पालकमंत्र्यांचा पत्ता नाही. कुठंय तुमचं कायद्याचं राज्य? आपण नेहमी नैतिकतेचे कांदे सोलता आता थोडी जरी नैतिकता असेल तर राजीनामा द्या, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे.

दरम्यान, पुण्यातील अपघात प्रकरणाची राज्यभरात चर्चा होत असताना पुण्याचे पालकमंत्री असणारेअजित पवारहे मात्र गायब असल्याने तर्क- वितर्क लावले जात होते. त्यातच आता रोहित पवार यांनी फडणवीसांच्या राजीनाम्याची मागणी करताना अजित पवार यांनाही लक्ष्य केल्याचं दिसत आहे.

धंगेकरांनी दिला ४८ तासांचा अल्टीमेटमपोलीस कॉन्स्टेबलची तातडीने चौकशी करत यांना निलंबित करा ,अन्यथा ४८ तासात यांचे इतर व्हिडिओ शेअर केली जातील, असा इशारा काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनी दिला आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना मी एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो. कल्याणीनगर अपघातानंतर तपासात अक्षम्य चुका होऊन देखील पुणे शहराचे पोलीस कमिश्नर अमितेश कुमार यांना अजूनही कोणी दोषी आहेत असे वाटत नाही.

अर्थात जो स्वतःच बिल्डरच्या पाकिटावर काम करतोय तो कसा कुणावर कारवाई करणार...? आजपासून मी तुम्हाला दररोज एका पोलिस स्टेशनवर सुरू असलेल्या गैर-कारभाराची कथा पाठवणार आहे. मुंढवा पोलीस स्टेशन हे पोलीस स्टेशन अवघे ३ कर्मचारी चालवतात. त्यापैकी निलेश पालवे ,काळे हे कॉन्स्टेबल सर्व पब , हॉटेल येथून हप्ते गोळा करण्याचे काम करतात, असा आरोप धंगेकर यांनी केला आहे.

## संपादकीय

# वाळवंटी हिरवळ

भारतासह जगभरातील जलद विकासाचा हवामान बदलावर परिणाम होत आहे. शास्त्रज्ञ त्यांच्या संशोधनातून वेळोवेळी याबाबत सावध करीत असतात;परंतु तमाम राज्यकर्ते आणि सामान्य माणूल शास्त्रज्ञांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करीत असतो. जर आपण योग्य खबरदारी घेतली नाही, तर त्याचा पर्यावरणावर विपरित परिणाम होईल, असे इशारे शास्त्रज्ञ देत असतात. आपल्यासाठी विशेषत: नवीन पिढीसाठी ही चांगली गोष्ट नाही, असे ते सांगत असतात. आता एका नव्या संशोधनात एक चांगली बाब पुढे आली आहे. हा अभ्यास राजस्थानच्या थर वाळवंटासह जगभरातील वाळवंटांवर करण्यात आला आहे. हवामान बदलाच्या परिणामांमुळे राजस्थानच्या थर वाळवंटात रखरखीत पसरलेल्या प्रदेशात बदल घडू शकतो, असे या अभ्यासात म्हटले आहे. वाढत्या तापमानामुळे जगभरातील अनेक वाळवंटांचा विस्तार होण्याचा अंदाज वर्तवला जात असताना, थरच्या वाळवंटावर उलट परिणाम दिसू शकतो. थर हे जगातील १८ वे सर्वात मोठे वाळवंट आहे आणि जगातील नववे सर्वात मोठे उष्ण उपोष्णकटिबंधीय वाळवंट आहे. हे राजस्थानपासून पाकिस्तानच्या सिंधपर्यंत सुमारे दोन लाख चौरस मीटरमध्ये पसरलेले आहे. हा अभ्यास 'अर्थ'ज फ्युचर जर्नल' मध्ये प्रकाशित झाला आहे. अभ्यासात शास्त्रज्ञांनी थरच्या वाळवंटाबद्दल भाकीत केले आहे. हे शतक संपण्यापूर्वी वाळवंट नाहीसे होईल, म्हणजेच ते हिरवे होईल. शास्त्रज्ञांनी त्यांच्या अभ्यासात अंदाज व्यक्त केला आहे, की २०५० सालापर्यंत सहारा वाळवंटाचा वार्षिक आकार सहा हजार किलोमीटरपेक्षा जास्त वाढू शकतो. त्याच वेळी, १९०१ ते २०१५ दरम्यान थरच्या वाळवंटातील सरासरी पर्जन्यमान १०-१५ टक्क्यांनी वाढले आहे.

हरितगृह वायूंच्या प्रभावामुळे भविष्यात येथील पावसाचे प्रमाण ५० ते २०० टक्क्यांनी वाढू शकते, असा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. शास्त्रज्ञांनी अभ्यासात पुढे म्हटले आहे, की भारतीय मॉन्सून पूर्वेकडे सरकल्यामुळे पश्चिम आणि उत्तर-पश्चिम भागात दुष्काळ पडला आणि हळूहळू या भागाचे वाळवंटात रुपांतर झाले, तर हजारो वर्षांपूर्वी येथे सिंधू संस्कृती अस्तित्वात होती आणि नंतर जोरदार पाऊस झाला. संशोधकांच्या मते सध्याच्या भारतीय मॉन्सूनच्या पश्चिम दिशेच्या विस्तारासह हा कल बदल, भारताच्या पश्चिम आणि वायव्य प्रदेशांना मूलत: आर्द्र मान्सून हवामानात बदलू शकतो. या बदलामुळे देशाच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नसुरक्षा वाढू शकते. जगातील १८ व्या सर्वात मोठ्या थरच्या वाळवंटाला 'ग्रेट इंडियन वाळवंट' असेही म्हणतात. हा भारतीय उपखंडाच्या वायव्य भागातील एक शुष्क प्रदेश आहे. तो भारत आणि पाकिस्तानमधील दोन लाख किलोमीटर क्षेत्र व्यापतो.

थरच्या वाळवंटाचा ८५ टक्के भाग भारतात आहे, तर १५ टक्के पाकिस्तानात आहे. थरच्या वाळवंटाने भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ४.५६ टक्के क्षेत्र व्यापले आहे. ६० टक्क्यांहून अधिक वाळवंट भारताच्या राजस्थान राज्यात आहे. त्याचा काही भाग गुजरात, पंजाब आणि हरियाणापर्यंतही पसरलेला आहे. जगभरातील अनेक शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार, पश्चिम राजस्थानचे वाळवंट येत्या ९० ते १०० वर्षांत नाहीसे होईल. पश्चिम राजस्थान पुन्हा चार हजार वर्षांपूर्वी जसे खूप हिरवे होते तसे होईल. पृथ्वीवरील विविध हवामान आणि पर्यावरणीय बदलांमुळे समुद्र, पर्वत, जंगले, वाळवंट, नद्या इत्यादींमध्ये व्यापक बदल होत आहेत. यापूर्वीही घडले आहे. अशाच बदलांमुळे, थरचे वाळवंटदेखील सुमारे ९०-१०० वर्षांत वाळवंट राहणार नाही. ते पूर्व राजस्थानप्रमाणे हिरवेगार होईल. आतापर्यंत हिंदी महासागर आणि अरबी समुद्रातून वाढणारा मॉन्सून फक्त पूर्व राजस्थानसाठी अधिक दयाळू होता.

पश्चिम राजस्थानवर नाही. त्यापेक्षा पश्चिम भारतातील मोठ्या भागात, गुजरातमधील कच्छ, राजस्थानमधील थर, पाकिस्तानमधील थर आणि हरियाणा-पंजाबच्या दक्षिणेकडील भागात फारच कमी पाऊस झाला आहे; मात्र गेल्या काही वर्षांत पश्चिम राजस्थानमधील पावसाची सरासरी दरवर्षी वाढत आहे. बारमेर, जोधपूर, जालोर, सिरोही, पाली आदी भागात पूरस्थिती निर्माण झाली होती. गेल्या वर्षी २०२३ मध्ये बिपरजॉय वादळाने या भागात कहर केला होता. त्याचा परिणाम गुजरात आणि पाकिस्तानमध्येही झाला. गेल्या दोन दशकांत पश्चिम राजस्थानच्या काही भागात अतिवृष्टी, वादळ आणि चक्रीवादळानंतर अशी दृश्ये आता सर्रास पाहायला मिळत आहेत. इंदिरा गांधी कालवा पश्चिम राजस्थानात आल्यावर तिथे लोकांनी शेती करायला सुरुवात केली. श्रीगंगानगर-हनुमानगड या पूर्वीच हरित भागात रूपांतरित झाले आहे. आता असेच बदल जैसलमेर, बारमेर, जालोर सारख्या भागात दिसत आहेत.

पर्यावरणाविषयीच्या वाढत्या जागरूकतेमुळे, वनविभाग, विविध सरकारी-निमसरकारी संस्था आणि लोकांनी गेल्या काही दशकांत थरच्या वाळवंटात करोडो झाडे लावली आहेत. याचाही परिणाम होऊ लागला आहे. सहारा (आफ्रिका) या जगातील सर्वात मोठे वाळवंट दरवर्षी विस्तारत आहे, पण थर विस्तारण्याऐवजी आकुंचन पावत आहे, हा देखील योगायोग आहे. हे एक सकारात्मक लक्षण आहे. सरकारी पातळीवर आणि समाज पातळीवरही आतापासूनच तयारी करायला हवी. या संपूर्ण परिसरात पावसाच्या पाण्याची बचत करणे, नद्या, तलाव, तलाव, ओढे यांचे व्यवस्थापन करणे, हिरवाई जलद होण्यासाठी काम केले पाहिजे. निसर्ग आपले काम करत असतो. त्याच्याशी ताळमेळ राखून आपणही चांगला पुढाकार घेतला पाहिजे. राजस्थानचे थर वाळवंट जिथे आहे, तो भाग दहा हजार वर्षांपूर्वीही हिरवागार होता. या काळात गुजरात, राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि पाकिस्तानच्या भागात सिंधू संस्कृतीचे पुरावे सापडले आहेत. लोथल, पिलीबंगा, कालीबंगा, अहार, धोलावीरा, राखीगढ़ी, मोहेंजोदारो या सर्व प्रदेशांची भरभराट झाली. त्या वेळी या प्रदेशात मॉन्सूनची सक्रियता अधिक होती. नंतर, मॉन्सून पूर्वेकडे सरकू लागला आणि हा भाग हळूहळू कोरड्या आणि वालुकामय भागात बदलला. आता मॉन्सून पश्चिमेकडील भागात पुन्हा पाऊस आणत आहे. अवैध खाणकामाचे वेगवेगळे तोटे आहेत. अरवली पर्वतरांग ही एक नैसर्गिक भिंत आहे, जी वाळवंटाचा प्रसार थांबवते. याचा अर्थ अरवली पर्वताने देशातील हिरवेगार, डोंगराळ भाग वाळवंटात बदलण्यापासून वाचवले आहेत. या पार्श्वभूमीवर अरवली वाचवणे अत्यंत गरजेचे आहे, तो निसर्गाचा एक महत्त्वाचा भाग आहे. वाढत्या जागतिक तापमानवाढीमुळे हिंदी महासागर सतत गरम होत आहे. शास्त्रज्ञांनी या परिस्थितीला 'इंडियन ओशन वॉर्म पूल' असे नाव दिले आहे. या उबदार तलावामुळे हिंदी महासागराचा एक भाग असलेल्या अरबी समुद्रातून वाढणारा मॉन्सून पश्चिमेकडे अधिक सरकत आहे. यामुळे, राजस्थान आणि गुजरात ही देशातील दोन राज्ये आहेत, जिथे गेल्या दशकांमध्ये सामान्यपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. या दोन्ही राज्यात थरचे वाळवंट पसरले आहे.

# गेल्यावर्षीच्या पुरामुळे फडणवीस सतर्क

## अंबाझरी तलाव परिसराची केली पाहणी



**नागपूर :** अंबाझरी तलाव परिसरात प्रशासनाच्या वतीने दीर्घ आणि अल्पमुदतीच्या उपाययोजना करण्यात येत असून ३० जूनपूर्वी अल्पमुदतीची सर्व कामे पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी या भागात पाहणी केल्यानंतर दिली. अल्पमुदतीची ही सुमारे २१ कोटी रुपयांची कामे आहेत, तर दीर्घमुदतीची सुमारे २०४ कोटींची कामे आहेत.

गेल्यावर्षी अतिवृष्टीमुळे पूर आल्यानंतर महापालिका, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयातून एक अल्प आणि दीर्घमुदतीचा आराखडा तयार करण्यात आला होता. दीर्घ मुदतीच्या उपाययोजनेंतर्गत तलावाच्या बळकटीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. हे काम अंतिम टप्प्यात असून येत्या १५ ते २० दिवसात ही कामे पूर्ण होणार आहेत. पाण्याची पातळी कायम ठेवण्यासाठी तीन गेटचे काम पूर्ण होण्यास ६ महिने लागतील. मात्र तुर्तास पाणी पातळी वाढल्यास ते बाहेर काढण्यासाठी एक चॅनल तयार करण्यात आले आहे. पाण्याचा सांडवा वाहून जाण्यासाठी पुलाचा अडथळा निर्माण झाला होता. या पुलाची उंची वाढविण्याच्या दृष्टीने पुल तोडून निर्माणकार्य सुरु आहे. पुलाचा एक भाग येत्या १० जूनपर्यंत पूर्ण करण्यात येईल तर दुसरा भागही वेळेत पूर्ण करण्यात येईल. तात्पुरत्या उपाययोजनांचा संपूर्ण टप्पा लवकरच पूर्ण होईल, अशीही माहिती देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

एनआयटी स्केटिंग रिंगच्या पार्किंग परिसरातील भाग तोडून नदीपात्र विस्तार करण्याचे कामही लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. आकस्मिक स्थितीत धरणातील पाणी व्यवस्थितपणे वाहून जाण्यासाठी या भागातील सर्व नदी नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरणाची कामेही पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येतील. धरणाच्या स्टॅटीक भिंतीसमोरील बांधकाम तज्ज्ञ समितीच्या सूचनेनुसार करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. या भागात सांडवा वाहून जाण्यास सुलभता येण्यासाठी काही भाग काढून चॅनल सुरु करण्यात येईल, यामुळे या भागातील पाणी वाहून जाण्यास कुठलाही अडथळा येणार नसल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# सरकारी बाबुंचा २० वर्षापासून शेतकऱ्यांवर अन्याय

**मुंबई / रमेश औताडे**

शेतकरी सुखी समृद्ध होण्यासठी सरकार विविध प्रकारच्या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जमेल तसे सहकार्य करत आहे. मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा वाढतील यासाठी काही सरकारी बाबू सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. आपल्या शेतजमिनीच्या न्यायासाठी देत असलेला २० वर्षापासूनचा लढा पहिला तर, हे सरकारी बाबू किती कठोर व मनमानी कारभार करत आहेत हे दिसून आले आहे.



नवी मुंबई येथील एम आय डी सी मधील राबाडे या ठिकाणी नारायण पाटील यांची पिढ्यानपिढ्या शेती आहे. अनेक वर्षापासून आंबा, वड, नारळ अशी विविध प्रकारची झाडे त्यांच्या शेतात होती. आपल्या पूर्वजांची ही शेती पाटील आनंदाने करत होते.

मात्र उद्योग व्यवसाय वाढीसाठी एम आय डी सी च्या काही नियमांचे पालन करत त्यांनी ही शेती एम आय डी सी ला दिली. पूर्ण मोबदला न मिळता फक्त अल्प नुकसान भरपाई मिळाली. तरीही पाटील यांनी कोणताही राग न धरता सरकारी आदेश पाळत उद्योग व्यवसाय वाढवा यासाठी सहकार्य केले.

सरकारला सहकार्य करणाऱ्या पाटील यांना मात्र एम आय डी सी च्या अधिकाऱ्यांनी शेतकरी न संबोधता भंगारवाला असे कागदोपत्री नामकरण करत अन्याय करायला सुरवात केली. त्या दिवसापासून पाटील यांनी न्याय मागण्यास सुरवात केली. आज २० वर्ष झाली पाटील न्याय मागत आहेत.

नगरसेवक , आमदार , खासदार , राज्यपाल , पंतप्रधान , राष्ट्रपती आदी सर्व विभागाला पत्र पाठवून न्याय त्यांनी मागितला. न्याय मिळत नाही म्हणून पाटील यांनी कोर्टाची पायरी चढण्याचा निर्णय घेतला. मात्र सरकारी बाबू व जमीन खरेदी करणारा उद्योगपती यांनी लाखो रुपये भरून पाटील यांच्या विरोधात नामांकित वकील उभे केले. या नामांकित वकिलांपुढे पाटील हतबल झाले आहेत. आज २० वर्ष झाली पाटील न्याय मागत आहेत.

पाटील यांनी उपोषणाचे हत्यार उपसले तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष घातले होते. तरीही सरकारी बाबू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत कागदी घोडे नाचवत आहेत. जमीन खरेदी करणाऱ्या उद्योजकाच्या बाजूने साम दाम दंड वापरून पाटील यांच्यावर अन्याय होत आहे.

पाटील यांनी अनेक वेळा पत्रकार परिषद घेत न्याय मागितला तरीही अद्याप न्याय मिळाला नाही. हतबल झालेले पाटील आपल्या २० वर्षाच्या अन्यायाची कहाणी सांगत असताना त्यांच्या डोळ्यात पाणी येते.

ज्या उद्योजकाने ही जमीन घेतली त्याने या शेतीमधील नैसर्गिक नाला बुजवला आहे. वनखात्याला अंधारात ठेऊन अनेक वर्षा पूर्वीची झाडे तोडली आहेत. पर्यावरणाची हानी केल्यामुळे त्याच्यावर अनेक तक्रारी झाल्या आहेत. मात्र कारवाई होत नाही. मात्र पाटील यांना धमक्या येत आहेत. पोलिस , गावगुंड , सरकारी बाबू , लोकप्रतिनिधी, सर्व यंत्रणा पाटील यांच्या विरोधात आहेत.

करोडपती उद्योजक थेट वरच्या कोर्टात कोणाच्या आशीर्वादाने जातो ? नैसर्गिक नाला कसा काय बुजवु शकतो ? शेकडो वर्षाची जुनी झाडे वनखात्याची परवानगी न घेता कशी काय तोडू शकतो ? पालिका, एम आय डी सी, लोकप्रतिनिधी गप्प का ? आदी प्रश्न पाटील यांनी माहितीचा अधिकार वापरत सरकारला विचारले आहेत.

# तथागत भगवान गौतम जयंतीनिमित्त धम्मपहाट कार्यक्रमाचे आयोजन

**हडपसर / पुणे :** जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पुणे स्टेशन येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ मोठ्या उत्साहात वैशाखी बुद्ध पोर्णिमा बुध्द जयंतीनिमित्त 'धम्मपहाट ' कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ विश्वभुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने बुद्ध जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भगवान गौतम बुद्ध जयंतीनिमित्त धम्मपहाट कार्यक्रमात महाराष्ट्रातील अनेक नामवंत कलाकार.धम्मपहाट कार्यक्रमात हजेरी लावली. महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका ' माझ्या भीमाच्या नावानं कुंकू लाविलं रमानं फेम सुष्मादेवी तसेच सारेगम फेम प्रतिक बावडेकर, इंडियन आयडॉल प्रतिक सोळसे ,गायक उदम साटम, दर्शन साटम,संतोष जोंधळे,गायिका कोमल धांडे, सोनाली सोनवणे यांनी बहारदार बुद्ध धम्म , भीम गिते गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. निवेदन प्रतिक जाधव व दिपक म्हस्के यांनी केले होते.

बुद्ध जयंतीनिमित्त सामुदायिक बुद्ध वंदना घेत यावेळी खीरदान वाटप करण्यात आले.

समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर व माजी उपमहापौर सुनिता वाडेकर यांनी पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात आले.

उपमहापौर यांच्या लहान बहिण संगिता संतराम कांबळे यांची कन्या कु.वृषाली संतराम कांबळे हिचा ीिलि( युपीएससी ) २०२३ मध्ये परिक्षेत ३१० क्रमांक घेऊन ख-ड (आयएएस) अधिकारी झाल्याने तिचा विशेष सत्कार करण्यात आला.

बुद्ध जयंतीनिमित्त कार्यक्रमास देश विदेशातून बौद्ध धर्म गुरु भंतेजी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे परशुराम वाडेकर व सुनिता वाडेकर यांनी केले होते.

# भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजच्या अभ्यासक्रमांची घोषणा

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेज(एरंडवणे,पुणे) ने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी अभ्यासक्रमांची घोषणा केली आहे. या अभ्यासक्रमांची माहिती भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठ विधी शाखेच्या अधिष्ठाता आणि न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उज्वला बेंडाळे यांनी पत्रकाद्वारे दिली.बी.बी.ए. एल.एल.बी. (५ वर्ष) ,बी.ए. एल. एल.बी. (५ वर्ष), एल.एल.बी(३ वर्ष ), एल.एल.एम.(२ वर्ष), तसेच पीएच.डी.(लॉ)साठी प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. बी.बी.ए. एल.एल.बी(५ वर्ष),बी.ए .एल. एल. बी.(५ वर्ष) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा दि.२३ जून रोजी आहे,त्यासाठी १४ जून ही नाव नोंदणीची अंतिम मुदत आहे. एल एल बी(३वर्ष ) साठी प्रवेश परीक्षा दि.२३ जून रोजी आहे,नाव नोंदणीची मुदत १२ जून ही आहे.एल.एल.एम. (२ वर्ष) साठी प्रवेश परीक्षा दि.१४ जुलै रोजी आहे ६ जुलै ही नाव नोंदणीची अंतिम मुदत आहे.

या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी एम एच सीईटी परीक्षा देण्याची आवश्यकता नाही,भारती अभिमत विद्यापीठाची सीईटी आवश्यक आहे .त्याविषयी अधिक माहिती ८०१०९७७०१० या दूरध्वनी क्रमांकावर तसेच www.bvpnlcpune.org या संकेतस्थळावर मिळू शकेल.

# हडपसरमधील संकेत विहार येथे टोळक्याकडून वाहानांची तोडफोड

**हडपसर :** हडपसर मधील संकेत विहार सर्वे नंबर १९६ या ठिकाणी रात्री एक च्या सुमारास टोळक्याकडून अनेक वाहानांची तोडफोड करण्यात आली असून अज्ञात जमावणे परिसरातील नागरिकांच्या रस्त्यावर पार्किंग करुन ठेवण्यात आलेल्या चारकाकी गाड्या कार, टेम्पो, रिक्षा आदी गाड्यांची तोडफोड करून नुकसान करण्यात आले आहे.

हडपसर भागात वारंवार टोळक्याकडून गाड्या तोडफोडीच्या घटना घडत आहेत.

गाड्यांची तोडफोड करणा-यास हडपसर पोलीसांनी तीनचार जणांना ताब्यात घेतले असून कशामुळे व कुठल्या कारणांमुळे गाड्या फोडल्या याची कसून चौकशी सुरु असल्याची माहिती हडपसर पोलीसांनी दिली



**संकेत विहार भागात व परिसरात अनेक अवैध धंदे चालतात , दारु पिऊन आरडाओरड करत असतात अशा नागरीकांना रात्री अपरात्री त्रास देणा-यावर कारवाई करण्यात यावी. संकेत विहार भागात पोलिसाचा बिलकुल लक्ष नाही चोरी, दादागिरी, दारुडे मंगळसूत्र चोरी अश्या अनेक घटना पूर्वी घडल्या आहेत तरी पोलीस प्रशासन लक्ष देत नाही अनेक वेळा निवेदन दिले कंप्लेन दिलेली आहे , पोलीस रात्री वेळी गस्त वाढवावी ,पेट्रोलिंग होत नाही पोलीस फिरकत ही नाहीत .संकेत विहार, काळेपडळ भागात पोलीसांनी गस्त वाढवावी.**

**ज्ञानेश्वर कांबळे**

**काँग्रेस प्रदेश सचिव स्थानिक नागरिक संकेत विहार**

हडपसर भागात नागरीकांना रात्रीच्या वेळी कांही टोळके एकटे फिरत असणा-यास दांडके, चाकूचा धाक दाखवुन लुटमार करून पसार होत असल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

प्रदीप ज्ञानदेव गलांडे, आकाश माधव बुधवंत, मारुती काळोखे, मच्छिन्द्र दादा फडतरे बबन रासकर, गुंडीबा कांबळे, तसेच अनेकांच्या गाड्या फोडल्या असल्याची माहिती मिळते.

हडपसर परिसरात रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्यात यावी अशी मागणी नागरीकांनी केली आहे.

# नरसिंह विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा ३५ वर्षांनी भरला वर्ग

**वळती :** आवडते मज मनापासून शाळा, लाविते लळा जशी माऊली बाळा ! आई आणि मुलाची उपमा देणारी शाळा प्रत्येकाच्या जीवनात आई-वडिलांनंतर संस्काराची शिदोरी आणि उज्वल भविष्याची वाट दाखवणारी असते. ज्या शाळेत आपण शिकलो मोठे झालो त्या शाळेच्या आनंददायी आठवणी आयुष्यात कधीच विसरल्या जात नाहीत हे तितकेच खरे आहे. आणि म्हणूनच नरसिंह विद्यालय रांजणी सन १९८९-९० च्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा गुरुवार दिनांक २३ रोजी नरसिंह विद्यालयात रांजणी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



विद्यालयाचे माजी विद्यार्थी राजेंद्र भोर,साहेबराव मेंगडे,गुलाब वाघ, या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

जवळ जवळ ३५ वर्षानंतर जुने मित्र मैत्रिणी एकत्र भेटल्यामुळे जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला.हा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. या नव्या जुन्या आठवणी पुढील आयुष्यभर उत्साह आणि प्रेरणा देत राहतील असे मनोगत व्यक्त करताना अनेकांनी सांगितले. यावेळी कुंडले सर, सुतार सर आणि घाडगे सर हे निवृत्त शिक्षक आणि सद्याचे मुख्याध्यापक असे ठराविक शिक्षक उपस्थित होते.

तर मुंबईहून खास उपस्थित असलेले माजी विद्यार्थी मंगेश जाधव,कमल चिंचपुरे ,जयसिंग जाधव , रमेश वाघ,किसन जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही आपले मनोगत व्यक्त करताना भावुक झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिक्षकांचा शाल श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. शाळेचे उतराई होण्याकरता शाळेसाठी काही तरी योगदान देण्याचे यावेळी सर्वानुमते ठरले तर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# धाराशिव, तुळजापूरला अवकाळीचा तडाखा

**धाराशिव :** धाराशिव व तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण भागाला गुरूवारी रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपून काढले.

वादळी वाऱ्यामुळे धाराशिव तालुक्यातील इर्ला, भंडारवाडी, दाऊदपूर व तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ, अणदूर, खुदावाडी या परिसरातील अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याने संसार उघड्यावर आले आहेत. कुठेही जीवितहानी झाली नाही. मात्र बागायती पिके, घरांचे नुकसान होवून आर्थिक हानी झाली आहे. तर झाडे व पत्रे पडून जनावरे जखमी झाले आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99



# केशवनगर येथील धम्मदायाद बुध्द विहारात रक्तदान शिबिर

**हडपसर :** वैशाखी बुध्द पोर्णिमा बुध्द जयंतीनिमित्त मुंढवा केशवनगर येथील धम्मदायाद बुध्द विहारात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

तथागत गौतम बुद्ध जयंतीचे औचित्य साधून धम्मदायाद बुध्द विहार व धम्मराज अशोक विचार व विकास मंचाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबवून बुध्द जयंती अनोख्या पध्दतीने बुध्द जयंती साजरी करण्यात आली. रक्तदान शिबिरात जवळपास २५ जणांनी रक्तदान शिबिरात सहभागी होत एक सामाजिक बांधिलकी जपली. रक्त संकलन डॉ.प्रथमेश मोराळे, डॉ.ऋषिकेश साळुंके, डॉ. अंकिता विर्जे ,डॉ.अमोल नवले यांनी केले.

यावेळी दिलीप दाइंजे सर, संदीप लोणकर, आर. जी. गायकवाड, जितिन कांबळे, महादेव दंदी, दीपक माने, किशोर समिंदर यांनी रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना सर्टिफिकेट आणि गिफ्ट देऊन सन्मान केला.

# नगरपालिका इमारत नव्हे... होणार मिनी मंत्रालय..!

## जयसिंगपूर शहरासाठी नगरपालिकेची सुसज इमारत पूर्णत्वाच्या मार्गावर

**जयसिंगपूर :** १५ कोटी रुपयांच्या माध्यमातून उत्पन्नासाठी १२ दुकानगाळे, पालिका विभागासाठी स्वतंत्र कक्ष, मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष कक्ष, अपगांसाठी रॅम्प, सभागृहे, तीन जीने, दोन लिफ्ट, देखाव्यासाठी दोन गार्डन अशा सर्व सोयीनिमित्त तयार होणारी जयसिंगपूर नगरपालिकेची इमारत पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. सदरच्या या इमारतीमुळे जयसिंगपूरच्या लौकिकात भर पडणार आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी १०३ वर्षांपूर्वी सांगलीला पर्यायी बाजारपेठ म्हणून उदगांवच्या फोंड्या माळावर जयसिंगपूर शहराची स्थापना केली. त्यामुळे येथे ग्रामपंचायत कार्यालय कार्यरत होते. कालांतराने शहराचा विस्तार वाढल्याने १ एप्रिल १९४२ साली याठिकाणी नगरपालिका स्थापन झाले. यावेळी पालिकेची कौलारू इमारत होती. कालांतराने ही इमारत अपुरी पडल्याने नवी प्रशासकीय इमारत उभारण्यात आली होती. यामध्ये सर्व प्रशासकीय कारभार बांधकाम विभाग, मुख्याधिकारी यांची केबीन व ग्रंथालय कार्यरत आहे. तर जुन्या कौलारू इमारतीत नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष केबिन, रेकॉर्ड रूम आहे. तर आतील जुन्या पत्र्याच्या इमारतीत सभागृह, आरोग्य विभाग व पाणी पुरवठा विभाग व स्वच्छतागृह आहे. या सर्वच विभागाच्या इमारतीची मोठी दुरावस्था झाली होती. यासाठी गेल्या वर्षभरापासून पालिकेकडून नवीन इमारतीच्या मान्यतेसाठी प्रयत्न सुरू होती. शिरोळ तालुक्याचे लोकप्रिय आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर व माजी नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून यांच्या विशेष प्रयत्नातून १५ कोटी रुपयांच्या माध्यमातून जयसिंगपूर येथील जुन्या स्थित असणाऱ्या नगरपालिकेच्या ठिकाणी या नवीन नगरपालिकेचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू आहे. दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर याच विक्रमसिंह क्रीडांगणावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी सभा झाली. या सभेवेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी आमदार यड्रावकर यांचे कौतुक करत शिरोळ तालुक्यात होत असलेल्या विकास कामाला निधी कमी पडू देणार नसल्याचा विश्वास दिला आणि सुरू असलेल्या नगरपालिकेच्या बांधकामाबाबत उल्लेख करून या इमारतीसाठी निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही दिली.

ही नवीन प्रशासकीय इमारत ७ मजली होणार असून, यामध्ये बेसमेंटला पार्किंगची सोय करण्यात येणार आहे व ग्राउंड फ्लोअरला दुकान गाळे व पाणीपट्टी - घरफाळा भरण्याची सोय होणार आहे. उर्वरित सर्व मजले हे प्रशासकीय कामकाजाकरिता वापरण्यात येणार आहेत त्यामध्ये मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व समितींचे सभापती सर्व विभाग प्रमुख यांच्याकरिता स्वतंत्र कक्षाची अत्याधुनिक सोय करण्यात येणार आली आहे. सर्वसाधारण सभा व स्थायी समिती करिता स्वतंत्र हॉल बांधण्यात आला आहे. सदर इमारतीमध्ये कन्सिल्ड वायरिंग असून आग प्रतिबंधक उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत. इमारतीमध्ये प्रत्येक विभागात स्वतंत्र कक्ष असलेले नागरिकांना कोणत्याही जागेमध्ये अगदी सहजतेने पोहोचता येणार आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणारी ही प्रशासकीय इमारत सर्व सोयी - सुविधा नियुक्त व परिपूर्ण अशी वास्तू असणार आहे. सदरची इमारती सीसीटीव्ही संपूर्ण निगराणी खाली असणार आहे व अद्यावत टेक्नॉलॉजी व फर्निचर चा वापरही या ठिकाणी करण्यात येणार आहे. सदरच्या इमारतीमुळे प्रशासकीय कामकाजामध्ये सुरळीतपणा तर येईलच पण रेकॉर्ड सुरक्षित व अद्ययावत ठेवणेस मोठी मदत होणार आहे.

माजी नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांनी या सुसज्ज इमारतीच्या बांधकामासाठी प्रत्यक्षपणे लक्ष घालून सर्व सुविधा निमित्त बांधकाम आणि विविध बाबींसाठी काम करीत आहेत. इतकेच नव्हे तर आमदारांच्या माध्यमातून या इमारतीसाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



### मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

**आमदार डॉक्टर राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून शिरोळ तालुक्यात विकास कामांची गंगा वाहत आहे. नुकत्याच लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जयसिंगपूर येथील विक्रमसिंह क्रीडांगण या ठिकाणी सभा झाली या भर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरपालिकेच्या इमारतीकडे पाहून आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली आणि या इमारतीसाठी कोणताही निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही दिली.**

# साताऱ्यात दोघे चेनस्नॅचरविरुध्द गन्हा

**सातारा :** सातारा शहरात बुधवारी विविध ठिकाणी तीन महिलांच्या गळ्यातीला सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरुन आलेल्या अज्ञातांनी जबरदस्तीने चोरुन नेले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात दोघा चोरट्यांच्या विरोधात जबरी चोरीचा गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, या घटना बॉंबे रेस्टॉरंट चौक, सदर बझार आणि जिल्हा परिषद मैदानाच्या गेटसमोर घडलेल्या आहेत. दुचाकीवरुन दोघे अज्ञात चोरटे आले होते. दोघेही ३० ते ३५ वयोगटातील होते. एकाने तोंडाला मास्क घातला होता. त्यांनी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पलायन केले. तर याप्रकरणी शुभांगी राजेंद्र निकम (रा. आदर्शनगर सातारा) यांनी तक्रार दिलेली आहे. या फिर्यादीच्या गळ्यातीलही ६० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरीस गेले आहे. सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक मोरे हे करीत आहेत.

# बुद्ध पौर्णिमेनिमित्त प्राणी व पक्षी जनगणना



**नारायणगाव :** बुद्ध पोर्णिमेनिमीत्त ओतुर वनपरिक्षेत्रामध्ये ११ पाणवठ्याच्या ठिकाणी वन्यप्राणी गणना करण्यात आली. यामध्ये वनकर्मचारी व वन्यप्रेमींनी पाणवठ्याशेजारी लपन करून, मचान बांधुन व ट्रॅप कॅमेरे लावून प्राणी व पक्षी यांच्या अस्तित्वाची नोंद केली. अशी माहिती ओतूरचे वनक्षेत्रपाल वैभव काकडे यांनी दिली

यामध्ये तृणभक्षी, मांसभक्षी प्राणी व पक्षी दिसुन आले. या प्राणीगणनेत मुख्यतः ससे, रानमांजर, उदमांजर, चिंकारा, निलगाय, तरस, भेकड, रानडुक्कर, सांबर, वानर, साळिंदर, मुंगुस, बिबट इ. वन्यप्राणी नर मोर, लांडोर, होला, किंगफिशर, कोयल बुलबुल, रानबगळा, बारबेट, रॉबिन इ. पक्ष्यांचे अस्तित्व दिसुन आले. सदर प्राणी पक्षी गणनेमुळे वन्यप्राणी व पक्ष्यांचे अस्तित्वाचे ठिकाण दिसुन आले व यानुसार वनविभागाला या प्राण्यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी उपाययोजना करण्यासाठी मदत होणार असल्याची माहिती वनक्षेत्रपाल काकडे यांनी दिली.

# डोंबिवली स्फोटाला सरकारही तितकेच जबाबदार : अंबादास दानवे यांचा आरोप

**मुंबई :** एमआयडी फेज २ मधील अमुदान कंपनीतील रिक्टरच्या आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला. तर, ६० हुन अधिकजण जखमी झाले आहेत. यावरून आता राजकीय वातावरणदेखील चांगलेच तापले आहे. आज (ता. २४) शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी घटनास्थळी भेट दिली आणि पाहणी केली. या अपघाताला

कंपनी व्यवस्थापन, सुरक्षा विभागासह सरकारही तितकेच जबाबदार असल्याचा आरोप दानवे यांनी केला. येत्या



अधिवेशनात हा याबाबत येत्या अधिवेशनात आवाज उचलणार असल्याचे दानवे म्हणाले.

पत्रकारांशी बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, रहिवासी भागांमध्ये विषारी केमिकल असणाऱ्या कंपन्या आणि धोकादायक फॅक्टरी असणे, हा एक मोठा गुन्हा आहे. जिथे रिक्टर आहे, तिथे टेक्निकल माणूस असणं गरजेचं आहे. पण इकडे कोणीही टेक्निकल माणूस असल्याचे दिसत नाही. हे साध्या कामगारांचे काम नाही, ही संपूर्णपणे कंपन्यांची जबाबदारी आहे.

या अपघाताला कंपन्यांचे व्यवस्थापन जबाबदार आहे. तसेच, औद्योगिक सुरक्षा विभागानेही याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे तेही तितकेच जबाबदार आहेत. तसेच, राज्य सरकारनेही योग्य ती दक्षता घेतली नाही. त्यामुळे सरकारही या अपघाताला तेवढेच जबाबदार आहे.

अकुशल कामगार व जुने रिॲक्टर वापरामुळे अशा घटना वारंवार घडतात, त्यामुळे बॉयलर प्रमाणे रिॲक्टरवर धोरण आणावे, अशी मागणी दानवे यांनी केली. तसेच या दुर्घटनेत जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांची अंबादास दानवे यांनी एम्स रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली.

# जीवनभर कल्याणकारी कर्म हाच तर गौतम बुद्धांचा धम्म

**वाई :** करुणाशील गौतम बुद्धांनी ईश्वर,स्वर्ग,नर्क,अशा कल्पनांना महत्व न देता सदाचरण केल्याने सुख कसे मिळते हे दाखवून दिले. पंचशीलाचे पालन केले तर आयुष्यातील अनेक दुःखापासून आपण मुक्त होतो आणि हाच सुखी जीवनाचा मार्ग असल्याचे बुद्धांनी सांगितले. बुद्ध धम्म सर्वांचे मंगल होण्यासाठीची आचार संहिता आहे. मन घडवेल तसा माणूस घडत असतो. मनाला चांगले वळण लावणे ,योग्य संकल्प करणे, वाणीचा हितकारी उपयोग करणे,व्यभिचार न करणे, दारू सारख्या विविध व्यसनातून मुक्त होणे,हिंसा होणार नाही अशी वर्तणूक करणे, स्वतःला ज्ञानी आणि विचारी बनवणे, स्वतःच्या मनात कोणत्याही वाईट प्रवृत्तींना स्थान न देणे, दान करणे, कुशल कर्मे करणे हा व्यवहार सुखमय करणारा विचार बुद्धांनी दिला आहे. जीवनभर कल्याणकारी कर्म करणे हेच बौद्ध धम्माचे तत्वज्ञान आहे,असे मत येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषामंडळाचे प्रभारी संचालक प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले. ते निढळ येथे संबोधी विकास मंडळ आयोजित केलेल्या गौतम बुद्ध जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी रमेश इंजे होते. यावेळी डॉ. प्रल्हाद इंजे,हनुमत इंजे ,राजाराम इंजे ,आबा इंजे,विशाल इंजे,गौतम इंजे,विनोद इंजे ,छाया वैद्य संबोधि विकास मंडळातील पदाधिकारी इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

वर्तमानकालीन समाजात निर्माण झालेल्या समस्यांची मुळे दैववादी,विषम विचारधारेचे परिणाम आहेत हे सांगताना ते पुढे म्हणाले की,बुद्ध धम्म हा शिस्तीचा व समजूतदारपणाचा विचार आहे. मनाची बेशिस्त ही अनेकांच्या आयुष्यात दुःखाला कारण ठरलेली आहे. माणूस नीट वागत नाही परिणामी त्याचा संसार आणि व्यवहार नीट होत नाही.तात्पुरत्या लाभासाठी काही माणसे खोटे बोलतात,मारामारी करतात,कोणाचा जीव घेतात ,बलात्कार करतात,धाक दाखवतात हे चांगल्या मनाचे लक्षण नाही. मोकाट सुटलेल्या मनामुळे अनेक वाईट घटना घडतात.म्हणून आपल्या मनाचे घर सुद्धा चांगले शाकारून घ्यावे लागते. ज्या वस्तूमुळे आपले नुकसान होणार आहे त्या गोष्टीपासून अलिप्त राहणे आवश्यक असते. विश्वासू माणूस बनण्यापेक्षा लोक दगा फटका करतात. व्यसनाने बरबादी होते तर काहीजण व्यसनाला प्रतिष्ठीत करतात. अनैतिक व्यवहार करायला जातात.त्यांना सदुपदेश करणाऱ्या माणसाचा राग यायला लागतो. आपल्या हिताच्या चांगल्या गोष्टी सांगणाऱ्या माणसाला किंमत द्यायला हवी पण स्वार्थ प्रबल असल्याने तृष्णा ,हपापलेपण ,अधाशीपणा वाढतच आहे. कष्ट करून सन्मार्गाने पैसे कमविण्याऐवजी भ्रष्ट मार्गाने संपत्ती मिळविण्यासाठी उचापती करणे याचे आता काही वाटत नाही.त्यामुळेच मग समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दगदग ,धावपळ ,अतिरेक हेच जीवन असेल तर त्यांचे परिणाम देखील आयुष्यावर होत असतात. म्हणूनच नितीमत्ता पाळून मध्यममार्गाने हळू हळू प्रगती झाली तरी चालेल पण शील पालन करायला हवे. निर्व्यसनी रहायला हवे ,उच्च शिक्षण घ्यायला हवे ,कोंबडीचे पंख लावण्यापेक्षा गरुडाचे पंख लावून चांगली ध्येये पूर्ण करायला हवीत. बुद्धांच्या अष्टांग मार्ग व दहा पारमिता यांचा शांतपणे अभ्यास करून आपले मन चांगल्यासाठी तयार करायला हवे .बाबासाहेबांनी खूप अभ्यास करून हा चांगला जीवन मार्ग आपल्याला दिला आहे. चांगली ध्येये अखंड परिश्रम करून पूर्ण करायला हवीत. आपण चांगले आचरण करून समाजातील सर्वांन प्रेरणा द्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रल्हाद इंजे यांनी केले. संबोधी विकास मंडळ निढळ मार्फत प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांचा सन्मान करण्यात आला. बुद्धवंदना घेण्यात आली. प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांच्या तर्फे निवडक विद्यार्थी,विद्यार्थिनी व शिक्षिका यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ भेट देण्यात आला .तर डॉ. प्रल्हाद इंजे,रमेश इंजे परिवार यांचे मार्फत संभाजी इंजे व मुक्ता इंजे ,कृष्णाजी इंजे ,मंगल इंजे यांच्या स्मरणदिनाचे औचित्य साधत शालेय,विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना वहया,पेन्सिल , पेन खोडरबर व आशा अहिल्यादेवी होळकर यांची पुस्तके भेट देऊन त्यांना यश मिळावे यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# स्वर्गीय राजमाता श्रीमती माधवीराजे शिंदे यांना सातारा जिल्ह्याच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

**कोरेगाव :** सातारा जिल्ह्यातील कन्हेरखेड गावचे सुपुत्र, देशाचे आदर्श नेते कै. माधवराव शिंदे व त्यांच्या पश्चात नामदार ज्योतिराज्य शिंदे यांचे मुळगाव कन्हेर खेडवर असणारे प्रेम तसूभर ही कमी झालेले नाही याची सातारा जिल्ह्याला प्रचिती आहे. आज स्वर्गीय राजमाता श्रीमती माधवीराजे शिंदे यांना समस्त सातारा जिल्ह्याच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेत माजी सभापती भीमराव काका पाटील यांनी केले.

कन्हेरखेड येथे स्वर्गीय श्रीमंत माधवराव शिंदे महाराज स्मारक येथे सकाळी ८.३० ते ९.३० च्या दरम्यान स्वर्गीय श्रीमंत माधवराव महाराज शिंदे यांच्या सुविद्य पत्नी व केंद्रीय मंत्री श्रीमंत महाराज ज्योतिराज्य शिंदे यांच्या मातोश्री स्वर्गीय राजमाता श्रीमती माधवीराजे शिंदे यांच्या रक्षा कलशाची शोकयात्रा काढण्यात आली, त्यानंतर रक्षा कलशाचे दर्शन व शोकसभा आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, आमदार महेश दादा शिंदे, आमदार शशिकांत शिंदे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन काका पाटील, कांतीलाल पाटील कोल्हापूर विमानतळ अधीक्षक अनिल शिंदे, मनोज दादा घोरपडे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सुनील माने, सुनील काटकर,



संभाजीराव शिंदे, संजय मोहिते, यशराज बाळासाहेब पाटील, सागर पाटील, राजेंद्र येशील कदम या सह पंचक्रोशीतील सर्व राजकीय पक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते,दुष्यंत राजे शिंदे, समीर शिंदे,प्रकाश शिंदे, जयदीप शिंदे, संभाजी शिंदे यासह समस्त कनेर खेड ग्रामस्थ व पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या संचालक कांतीलाल पाटील, संजय शिंदे, अनिलराव शिंदे, संभाजीराव शिंदे, संजय मोहिते यासह इंदापूर, पुणे व अनेक ठिकाणाहून आलेल्या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी छत्रपती श्रीमंत उदयनराजे भोसले आमदार शशिकांत शिंदे आमदार महेश दादा शिंदे यांच्यासह सर्व उपस्थित मान्यवरांनी अस्ति कलशावर फुल वाहून पुष्पवृष्टी करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# सांबरवाडीत ऑनलाईन ३२ हजाराची फसवणूक

**सातारा :** हॉटेलमध्ये राहून बिलाची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचे भासवून ३२ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना सांबरवाडी येथील एका हॉटेलात घडली. याप्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात जकातवाडीच्या एकावर गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी चंद्रसेन धनंजय जाधव (रा. पोवईनाका सातारा) यांनी तक्रार दिलेली आहे. त्यानुसार पंकज गणपत बाबर (रा. जकातवाडी, ता. सातारा) याच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. दि. १४ ते १८ फेब्रुवारीदरम्यान ही घटना घडली आहे.

संशियत पंकज बाबर याने सांबरवाडी, ता. सातारा येथील एका हॉटेलमधील एसी खोली बुक केली होती. त्यावेळी त्याने खोली, जेवण आणि मद्याच्या बिलासाठी ३५ हजार रुपयांची आगाऊ रक्कम हॉटेलच्या खात्यावर ऑनलाईन पाठविल्याचे सांगितले. तसेच पैसे गेल्याचा मेसेजही दाखविण्यात आला. त्यामुळे यावर विश्वास ठेवून त्याला हॉटेलात खोली दिली. तसेच राहिलेल्या कालावधीत ऑर्डरप्रमाणे जेवण आणि मद्य पुरविण्यात आले. मात्र, दि. १८ फेब्रुवारीला पहाटे तो कोणासह न सांगता आणि सुमारे ३२ हजार रुपयांचे बील न देता निघून गेला. तसेच ऑनलाईनचे पैसे हॉटेलच्या खात्यावरही जमा झाले नाहीत. त्यामुळे फसवणूक झाल्याचे समोर आले.

सातारा तालुका पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दि. २२ मे रोजी दुपारी साडे बाराच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. हरिदास विठ्ठल मोरे यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार अंजना सुभाष मुळीक, अजिंक्य सुभाष मुळीक, भरत सुभाष मुळीक, दिलीप काटे, स्नेहेल अजिंक्य मुळीक, सागर शिंदे (सर्व रा. वडूथ) यांच्याविरोधात गुन्हा नोंद झाला आहे. तर अंजना सुभाष मुळीक यांनीही तक्रार दिली आहे. या तक्रारीनुसार हरिदास विठ्ठल मोरे, कृष्णात विठ्ठल मोरे, ओमकार हरिदास मोरे, ज्योती हरिदास मोरे, कोमल दत्तात्रय मोरे, पिंकी हेमंत मोरे, मोनिका कृष्णात मोरे (सर्व रा. वडूथ) यांच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाला मदतीसाठी सहकार्य करु - राज्यपाल रमेश बैस

**सातारा :** सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाला आवश्यक असणाऱ्या मदतीसाठी शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यात यावा. त्या प्रस्तावाची प्रत राज्यपाल कार्यालयास पाठविण्यात यावी. शासनाकडून निधी उपलब्धतेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही राज्यपाल रमेश बैस यांनी दिली.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाची (समूह विद्यापीठ) स्थापना ऑक्टोंबर २०२१ मध्ये झाली आहे. या विद्यापीठाच्या कामकाज, अडीअडचणी याबाबत महाबळेश्वर येथील राजभवनात राज्यपाल बैस यांनी आढावा घेतला. यावेळी राज्यपालांच्या सहसचिव श्वेता सिंघल, विद्यापिठाचे कुलाधिकारी चंद्रकांत दळवी, कुलगुरु डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विजय कुंभार, उपसचिव रविंद्र धुरजड आदी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्था ही देशातील अत्यंत जुनी व मोठी शिक्षण संस्था आहे. या संस्थेच्या अंतर्गत जवळपास साडेचार लाखाहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या संस्थेच्या समूह विद्यापीठाला शासनाने मंजुरी दिली असून समूह विद्यापीठांना मंजुरी देत असताना शासनाचे जे धोरण होते त्या प्रमाणे आवश्यक ती सर्व मदत शासनाकडून उपलब्ध व्हावी, अशी मागणी विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. यावर कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाला आवश्यक मदतीसाठी शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यात यावा. शासनाकडून निधी उपलब्धतेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही राज्यपाल रमेश बैस यांनी दिली.

# इंदापूरचे तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यावर जीवघेणा हल्ला

**इंदापूर :** इंदापूरचे तहसीलदार श्रीकांत पाटील यांची शासकीय गाडी फोडत त्यांच्यावर जीवघेणा हल्ला शहरातील संविधान चौकात करण्यात आला आहे. पाच ते सहा अज्ञात हल्लेखोर हे स्कॉर्पिओ गाडी मधून आल्याची प्राथमिक माहिती आहे.

तहसीलदार श्रीकांत पाटील हे सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास तहसील कार्यालयाच्या दिशेने जात असताना इंदापूर पोलीस स्टेशन पासून अगदी हाकेच्या अंतरावर असणाऱ्या संविधान चौकात हा हल्ला करण्यात आला.

यावेळी तहसीलदार श्रीकांत पाटील व त्यांचे चालक मल्हारी मखरे हे गाडीमध्ये होते. हल्लेखोरांनी चालकाच्या दिशेने

## गाडी फोडली; हल्लेखोर स्कार्पिओतून पसार



मिरची पूड टाकत संपूर्ण गाडी लोखंडी रॉडने फोडत हल्ला केला आहे.

या घटनेनंतर श्रीकांत पाटील व चालक मल्हारी मखरे यांना इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले असून, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. सदरील हल्ला हा वाळूमाफियांकडून करण्यात आला असावा असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.घटनेनंतर महसूल प्रशासनाच्या सर्व अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी कामकाज बंद ठेवत पोलीस ठाण्याकडे धाव घेतली आहे. पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

# कोरेगाव येथे गिरणी कामगारांचा संयुक्त एल्गार

## !!संघर्ष माझा! !जबाबदारी माझी!!

**कोरेगाव :** गिरणी कामगारांच्या तिव्र लढ्याला कामगार व वारसांनी सक्रिय पाठिंबा जहीर केला. यावेळी समन्वय सदस्य समितीचे रमाकांत बने, हेमंत गोसावी, उत्तम शिंदे, अशोक रेवाळे, सुधिर निकम, तानाजी चव्हाण, कॉ. शंकर पाटील, कॉ शिवाजी पाटील, गणपत भोसले, रविंद्र शिंदे, नथू सराटे, हनुमंत निकम, बाळू यादव, महादेव यादव,चंद्रकांत चव्हाण, आनंदराव घोरपडे, हनुमंत मोहीते यांच्या सह शेकडो गिरणी कामगार व वारसांनी खालील मागण्या मान्य करुण घेण्यासाठी प्रतिज्ञा घेतली.

**सयुक्त मराठी मुंबई चळवळ २०२४**

लढ्याच्या प्रमुख मागण्यामध्ये गिरणी सन १९९१ साली न्यायलयाने बी.एम. सी, गिरणी मालक व गिरणी कामगारांना गिरणीतील ६०० एकर जमिनिचे समान वाटप करून दिले होते. ते कायदेशिर २०० एकर गिरणी कामगारांच्या जमीनीचा वाटा शासनाने त्वरीत द्यावा व सर्व गिरणी कामगारांचे पुनर्वसन मुंबईतच करण्यासाठी वनटाईम कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा. १५ मार्च २०२४ चा जीआर गिरणी कामगारांचे मुंबईतील अस्तित्वा नाकारणारा आहे याला आमचा विरोध आहे हा जीआर त्वरित रद्द करावा.

गेले ४२ वर्षे गिरणी कामगारांना उध्वस्थ करण्यासाठी भ्रष्ट राजकीय नेत्यांना हाताशी घेऊन कामगारांच्या कायदेशिर हक्काच्या जमिनी हडप करणाऱ्या गिरणी मालकांच्यावर दंडात्मक कारवाई करुन गिरणी कामगारांच्या घरांची किंमत वसूल करावी व मुंबईतच विनामुल्य गिरणी कामगार व वारसांचे पुनर्वसण करावे.

तसेच मुंबईचा विकास व औद्योगिक क्रांतीसाठी चारलक्ष गिरणी कामगारांच्या कुटुंबानी आपले योगदान दिले आहे. शासनाच्या भाडवलशाही धोरणामुळे कामगारांच्या वारसांचा कायमचा मुंबईतील रोजगार नष्ट झाला आहे याच विचार करून १९८२अट रद्द करून सर्व गिरणी कामगारांना मुंबईच सामाऊन घेणारा कायदा तयार करावा. कामगारांच्या न्याय व हक्काच्या

या मागण्या घेऊन महाराष्ट्र भर दौरा करुन जनजागृती करण्याचा निर्धार आजच्या सभेत एक मुखी निर्णय घेण्यात आला.

# आढाळगावात आग लागून घर बेचिराख

## आमदार मकरंद पाटील यांनी भेट देवून जळीत ग्रस्त कुटुंबाला दिली ५० हजाराची मदत

**महाबळेश्वर :** मतदार संघात विकास कामांचा डोंगर रचुन कायम लोकांच्या संपर्कात राहतात म्हणुन लोकांनी आ मकरंद पाटील यांना जननायक ही पदवी बहाल केली परंतु आ पाटील हे केवळ जननायकच नाही तर दयावान आमदार असल्याचे त्यांनी दाखवुन दिले आहे आज आढाळ ता महाबळेश्वर येथील एका जळीतग्रस्त कुटूंबास आ पाटील यांनी आपल्या खिशातुन रोख पन्नास हजार रूपयांची मदत दिली व शासना कडुनही नुकसान भरपाई मिळवुन देण्याचा प्रयत्न करतो असे आश्वासनही पाटील यांनी दिले

महाबळेश्वर येथे बुधवारी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली रात्री वादळी पावसाने आढाळ ता महाबळेश्वर येथील विठ्ठल रामचंद्र हिरवे यांचा संसार उघडा पडला पावसामुळे शॉर्ट सर्किट झाले आणि हिरवे यांच्या घराला आग लागली या आगीत हिरवे यांचे घर जळुन भस्मसात झाले या आगीत हिरवे यांच्या घरातील संसारोपयोगी साहीत्या बरोबरच अन्नधान्य भांडी देखिल जळुन खाक झाले अवकाळी मुळे हिरवे यांच्यावर मोठ संकटच कोसळले

आढाळ गावचे सरपंच सुनिल जंगम यांनी ही बाब जिल्हा बॅंकेचे राजेंद्रसेठ राजपुरे पंचायत समितीचे माजी सभापती संजय गायकवाड यांनी कळविली या दोन्ही नेत्यांनी तातडीने ही बाब जननायक आ मकरंद पाटील यांना कळविली आज दुपारी आ मकरंद पाटील यांनी आढाळ गावाला भेट दिली.



त्यांनी आगीत भस्मसात झालेल्या घराची पाहणी केली या वेळी राजेंद्रसेठ राजपुरे संजय गायकवाड गुरेघरचे सरपंच रमेश चोरमले रोहीत ढेबे सुभाष कारंडे व आढाळचे सरपंच सुनिल जंगम व ग्रामस्थ उपस्थित होते हिरवे कुटुंबावर कोसळलेल्या संकटामुळे आ. मकरंद पाटील हे हळहळले त्यांनी सर्वात प्रथम आपल्या वतीने तातडीने ५० हजाराची आर्थिक मदत दिली या दौरयात जिल्हा बॅंकेचे संचालक राजेंद्रसेठ राजपुरे हे देखिल होते.

त्यांनी ही हिरवे कुटुंबियांना मदतीचा हात पुढील दोन महीन्यांचे संपुर्ण कुटुंबाला अन्नधान्यासह रेशन देणार असल्याचे त्यांनी सांगितले या शिवाय आ मकरंद पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकारी यांच्या बरोबर चर्चा करून आगीत भस्मसात झालेल्या घराचा पंचनामा करण्याच्या सुचना केल्या.

या पंचनाम्याच्या आधारे शासना कडुन हिरवे कुटुंबास नुकसान भरपाई मिळवुन देण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे आ मकरंद पाटील यांनी या वेळी सांगितले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत युवक ठार

**मसूर :** अज्ञात भरधाव वाहनाने धडक दिल्याने एक युवक ठार झाला. मसूर उंब्रज रोडवर कोरेगाव फाट्यानजीक गायत्री पेट्रोल पंपासमोर गुरुवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास हा अपघात घडला. अनिकेत अनिल जगताप वय २४ राहणार अंतवडी तालुका कराड. असे अपघातात ठार झालेल्याचे युवकाचे नाव आहे.

या संदर्भात पोलिसांनी दिलेली माहिती अशी अनिकेत जगताप हा मसूर - उंब्रज रस्त्याने चालत असताना गायत्री पेट्रोल पंपासमोर भरधाव अज्ञात वाहनाने त्यास जोरदार धडक दिली. धडक देऊन वाहनाने पळ काढला. वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झाल्याने अनिकेत ठार झाला.

कराडला टूर अँड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय त्याचा आहे. अपघाताची खबर विनोद पोपट जाधव राहणार अंतवडी ता कराड यांनी मसूर पोलीस ठाण्यात दिली आहे. अज्ञात वाहन चालकावर मसूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचा तपास मसूर

## वडूथ येथे दोन गटात राडा

### परस्पराविरोधी तक्रार; १३ जणांवर गुन्हा

**सातारा :** वडूथ, ता. सातारा येथे घराच्या बांधकामावरुन दोन गटात मारामारी झाली. याप्रकरणी सातारा तालुका पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रार देण्यात आली आहे. पोलिसांनी दोन्हीकडील १३ जणांवर गुन्हा नोंद केला आहे.

# रहिमतपूर परिसरातील वादळी वाऱ्यामुळे आणि पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने मदत करावी : आमदार शशिकांत शिंदे

**कोरेगाव :** आपल्या सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर परिसरामध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे विविध ठिकाणी अतोनात नुकसान झाले आहे. यामध्ये अनेक घरांची पडझड, शेतपिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे.

रहिमतपूर बेघर वस्ती, काटे वस्ती, दत्तनगर, बोरिव, अंगणवाडी बोरिव शाळा, अशा विविध ठिकाणी भेटी देत आमदार शशिकांत शिंदे यांनी झालेल्या नुकसानीची पाहणी केली. नुकसान झालेल्या शेतकरी बांधवांना आधार दिला.

तसेच रहिमतपूर परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे आणि पावसामुळे झालेल्या नुकसानीची कोरेगाव तालुक्यातील प्रशासनाने तातडीने तातडीने पाहणी करावी आणि पंचनामे करून शेतकऱ्यांना



लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याचे आदेश सर्कल, तलाठी तसेच संबंधित अधिकाऱ्यांना कोरेगाव तालुक्यातील महसूल आणि पंचायत समिती प्रशासनाने द्यावेत अशी मागणी आमदार शशिकांत शिंदे यांनी यावेळी केली.तसेच वादळी वाऱ्यामुळे आणि पावसामुळे खंडित झालेला वीजपुरवठा सुरळीत करून द्यावा तसेच आवश्यक ठिकाणी दुरुस्ती करण्यास सूचित केले.

तसेच आपल्या पाहणी दौऱ्यामध्ये आमदार शशिकांत शिंदे यांनी बोरीव( ता. कोरेगाव) येथील नुकसानग्रस्त प्राथमिक शाळेची आणि अंगणवाडीची पाहणी केली. बोरिव गावाला तातडीने अंगणवाडी बांधून द्यावी आणि प्राथमिक शाळेच्या खोल्या बांधून द्याव्यात अशी मागणी कोरेगावचे तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्याकडे दूरध्वनीद्वारे केली.

**३३ के व्ही, एल टी, एच टी सर्वच प्रकारचे मिळून साधारण ४५ ते ५० खांब पावसाने पडले असून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी जवळपास ७१ जणांची टीम कार्यरत आहे. सुरवातीला डी. पी. दुरुस्त करून गावठाणातील वीजपुरवठा पूर्वक करण्याचे काम सुरु आहे. सध्या महावितरणचे १५ ते १६ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.**

**- रवींद्र धर्मे (महावितरण सहायक अभियांतता )**

**पंचनामे सुरु -**

**रहिमतपूर, बेघरवस्ती, बोरिव याठिकाणचे झालेल्या नुकसाचे पंचनामे सुरु असून नुकसान ग्रस्तांना शासनाकडून योग्य ते मदत मिळवून देण्यासाठी लवकरात लवकर पंचनामे पूर्ण केले जातील.**

**- पृथ्वीराज पाटील, (तलाठी रहिमतपूर)**

या नुकसानग्रस्त पाहणी दौऱ्यामध्ये जिल्हाध्यक्ष सुनील माने, अविनाश माने, आनंदा कोरे, विद्याधर बाजारे काका, विकास तुपे, ग्रा.पं.सदस्य चंद्रकांत पोळ , सहदेव कृष्णा पोळ, शंकर पोळ पाटील, वामन पोळ, दिपक पोळ, सुरेश चव्हाण, सुधाकर पोळ, रमेश पोळ, बाळासाहेब पुजारी, संतोष पोळ, उमेश पोळ, अनिल पोळ, प्रशांत पोळ, ओमकार घोरपडे, ज्ञानदेव पोळ, राजेंद्र पोळ, रामदास घोरपडे, तानाजी पोळ, नाना पोळ, राजु पोळ, सुर्यकांत पोळ, युवराज पोळ, गोविंद पोळ, सुशांत थोरवे आदी सहभागी झाले होते.

कालच्या पावसाने अनेक घरांचे जाणवरंचे शेड उडाले असून घरात पाणी शिरून मोठ्या प्रमाणत गृहउपयोगी वस्तूंचे नुकसान झाले असून अन्न धान्य हि भिजले आहे. या झालेल्या नुकसानाने अनेक नुकसानग्रस्त हाताबाल झाले असून ते मदतीची अपेक्षा करत आहेत.

# वीज वितरणच्या कारभारामुळे सातारकर संतप्त

## दैनंदिन कामकाजासह पाणीपुरवठ्याचा खोळंबा

**सातारा :** गेल्या चार ते पाच दिवसापासून सातारा शहर परिसरात वीज सातत्याने खंडित होत असून नागरिक संतप्त झाले आहे . नागरिकांच्या दैनंदिन कामकाजासह सदनिकांमध्ये पाण्याच्या टाकीत पाणी चढवणे जिकिरीचे झाले आहे साताऱ्यात बेपत्ता होणारी वीज सातारकरांसाठी अडचणीची ठरत आहे .

सध्या जिल्ह्यात अवकाळी पाऊस सुरू असून ग्रामीण भागात वादळी वाऱ्यामुळे खांब पडणे वायर तुटणे यामुळे वीज जाणे असे प्रकार घडत आहेत परंतु सातारा शहर परिसरात ढग अंधारून आले की लगेच वीज घालवली जात आहे . एकदा वीज गेली की किमान ती अर्धा ते पाऊण तास गायब होत असल्याने नागरिकांची उष्म्यामुळे काहीली होत आहे . गेल्या तीन दिवसापासून रात्री बाराच्या नंतर किमान अर्धा ते पाऊण तास सातत्याने वीज जात आहे या संदर्भात वीज वितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता ते केवळ तांत्रिक बिघाड असे सरकारी छापाचे उत्तर देऊन वेळ मारून येत आहेत . खंडित वीज पुरवठ्याचा फटका शहरातील पाणी वितरणाला बसत आहे . बोगदा , शनिवार पेठ, सदर बझार, कूपर कॉलनी येथील मोठया अपार्टमेंटमध्ये ग्राउंड लेव्हलच्या टाकीचे पाणी छतावरील टाकीत पोहचू शकत नाही . परिणामी नागरिकांच्या सकाळच्या सत्रातील कामांचा खोळंबा होत आहे .

काल सायंकाळी पावणेसातला गेलेली पावणे नऊला आली दिवसभरात किमान तीन ते चार वेळा वीज गायब होत असून यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे मोठे नुकसान होत आहे, त्यामुळे अनेक कामे ठप्प होत आहेत .वीज कंपनीच्या राजवाडा कार्यालयाचा फोन वीज गेले की काढून ठेवला जातो येथे कोणतेही कर्मचारी उत्तर देण्यासाठी उपलब्ध नसतात वीज वितरणच्या कारभाराची अवकाळी पावसात ही अवस्था असेल तर पावसाळ्यात काय होईल कंपनीने तातडीने या संदर्भात सुधारणा केली पाहिजे नाहीतर नागरिक कंपनीच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढतील अशी स्थिती आहे . साताऱ्याचे माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी यासंदर्भात आंदोलनाची तयारी सुरू केली आहे.

# १४ विज वाहिन्या ४८ तास पूर्ववत सुरू !

**खंडाळा :** तालुक्याच्या पश्चिम भागात दोन दिवसापूर्वी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे महावितरणचे सुमारे २१ लाख रुपयांचे नुकसान झाले.दरम्यान, या पावसात बंद असणाऱ्या १४ वीज वहिन्या ४८ तास अविरत मेहनत घेत पूर्ववत सुरु करण्यात यश आल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता रणजीत चांदगुडे यांनी दिली.

गत दोन दिवसापूर्वी सायंकाळी झालेल्या वादळी वारे व पावसामुळे महावितरणचे उच्चदाब,लघुदाब वाहिन्याचे १४७ खांब, इन्सुलेटर, तारा,पाच रोहीत्रांचे नुकासान झाले असुन १४ वाहिन्या बंद पडल्या होत्या. त्यामुळे खंडाळा, शिरवळसह तालुक्याच्या पश्चिम भागातील जवळे गावठाण, लोहोम गावठाण, शिरवळ शहर, शिरवळ औद्योगिक, वाई औद्योगिक, विंग गावठाण, शिंदेवाडी गावठाण व औद्योगिक,कॅप्सूल एक्सप्रेस,लॉकिंम एक्सप्रेस,युनिकोर एक्सप्रेस,म्हावशी इन्कमर, खंडाळा शेती, विंग औद्योगिक हि ठिकाण बाधित झाली होती तर काही गावं अंधारात होती.

खंडाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. चांदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अभियंता प्रविण महांगरे,सुरंजीत रॉय,वैभव भोसले, हर्षद मुळीक दादा बारवकर, सोमनाथ धायगुडे यांच्यासह महावितरण कंपनीचे ३५ आणि ठेकेदाराचे ६५ असे एकूण १०० कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमधुन १४ वाहिन्या केवळ ४८ तासात दुरुस्त करून विज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

# प्रस्तावित करभरणी प्रक्रियेच्या तयारीला पालिकेकडून गती

## ४२ कोटीचे उद्दिष्ट राहण्याची शक्यता

**सातारा :** सातारा पालिका आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील प्रस्तावित कर भरणा प्रक्रियेच्या तयारीला लागली आहे. यावेळेचे उद्दिष्ट ४२ कोटी रुपये असण्याची शक्यता असून त्या दृष्टीने सातारा शहराच्या हद्द वाढीतील ६५ हजार मिळकत धारकांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत. यावेळी शंभर टक्के वसुलीचे उद्दिष्ट पालिकेच्या वसुली विभागाने ठेवले आहे.

गेल्या आर्थिक वर्षात सातारा पालिकेने ३७ कोटी ४१ लाख रुपयांचे उद्दिष्ट समोर ठेवले होते. सातारा पालिकेच्या वसुली विभागाने ३२ कोटींची वसुली केली. ही वसुली ८० टक्के होती उर्वरित थकबाकी वसूल करण्याबरोबरच यंदाच्या करवसुलीसाठी पालिका सज्ज झाली असून वसुली विभाग त्या कामाला लागला आहे. वसुली विभाग अधीक्षक नीता फडतरे यांनी याची माहिती दिली आहे वसूली विभागाने नव्याने तयार करण्यात येणाऱ्या नवीन कर मागणी नोटीसा तयार करण्याचे काम सुरू केले आहे. यंदाचे उद्दिष्ट ४२ कोटींचे उद्दिष्ट राहण्याची शक्यता आहे. कर वसुलीच्या नोटीसा तयार झाल्यानंतर त्यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी भाग लिपीक व त्यांच्या सहकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे नोटीसा बजावत असतानाच मिळकत धारकांना सुरू असणाऱ्या आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील प्रस्तावित कर भरणा तात्काळ करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

कर मागणीच्या नोटिसा बजावल्यानंतर नागरिकांना घरबसल्या कराचा वारणा करता यावा यासाठी बारकोड, पॉस मशीन व ऑनलाइन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गेल्या वेळची वसुली का रखडली? याचा शोध घेऊन यंदा १००% वसुली करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यादृष्टीने तयारी पूर्ण झाल्याचे मुख्याधिकारी अभिजीत बापट यांनी सांगितले. गतवर्षी सातारा लोकसभा निवडणुकांच्या तयारीमध्ये सातारा पालिकेची ४०% मनुष्यबळ यंत्रणा गुंतली होती त्यामुळे वसूल विभागावर ताण पडला होता मात्र लोकसभा निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे त्या प्रक्रियेनंतर सातारा शहराच्या हद्दीतील ६५ हजार मिळकत धारकांना चालू वर्षाच्या घरपट्टीच्या नोटीसा पाठवल्या जाणार असल्याची चिन्हे आहेत.

# आपत्तीपूर्व नियोजन व समन्वय आवश्यक : प्रांताधिकारी सुनील गाडे

**पाटण :** संभाव्य नैसर्गिक व अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सर्व विभागांनी पावसाळा सुरू होण्यापूर्वी पूर्वतयारी करून आपत्ती काळात जनतेला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. संभाव्य अडचणींचा विचार करून योग्य ती साधने उपलब्ध करून ठेवावीत. २ वर्षापूर्वी भूस्खलन व पूरपरिस्थितीत आपण सर्वांनी चांगले काम केले असून तेच सहकार्य या वर्षीही अपेक्षित आहे. प्रत्येक विभागाने एकमेकांशी समन्वय साधून काम करावे. मी स्वतः व तहसीलदार चोवीस तास अलर्ट आहेत. कोणतीही अडचण आल्यास तत्काळ संपर्क करा, असे आवाहन प्रांताधिकारी सुनील गाडे यांनी केले.



पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी तहसीलदार अनंत गुरव, गटविकास अधिकारी गोरख शेलार, कोयना जलसिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता नीतेश पोतदार, पाटणचे पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रांताधिकारी गाडे म्हणाले, २०२१ साली भूस्खलन झाले होते. तेव्हा रस्ता खराब असल्याने घटनास्थळी पोहोचण्यासाठी एनडीआरएफ टीमला वेळ लागला होता. त्यामुळे संबंधित विभागाने रस्त्यांची डागडुजी करून घ्यावी. कमी काळात जास्त पाऊस झाल्याने परिस्थिती उद्भवली होती. मात्र, दोन वर्षापासून पर्जन्यमान कमी आहे. तरीही सर्वांनी सावध रहा, टोळेवाडी रस्ता धोकादायक असून त्याबाबत बांधकाम विभागाने लक्ष द्यावे. कसणीच्या पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी करावे. अतिवृष्टी काळात पाटण नगरपंचायतीची जबाबदारी मोठी असून नगरपंचायत प्रशासनानेही दक्ष रहावे. शहरातील होर्डिंगबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे सक्त आदेश आहेत. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागात ज्या ठिकाणी अनधिकृत होर्डिंग आहेत ते तत्काळ हटवावेत. त्यात अडथळे येत असतील तर पोलीस बंदोबस्त घेऊन होर्डिंग्ज काढा. जास्त पाऊस व वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने मुंबईप्रमाणे येथेही घटना घडू शकते. त्यामुळे तातडीने कार्यवाही करावी. पाटण शहरातही सरकारी जागांवर अतिक्रमणे झाल्याने पूरपरिस्थिती निर्माण होते. पाटण नगरपंचायत प्रशासन ही अतिक्रमणे का काढत नाही? असा सवाल करून सरकारी जागेवरील अतिक्रमणे काढण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या. कोयना विभागातील हेळवाक आरोग्य केंद्रात डॉक्टरची नेमणूक करावी. शहरातील झाडांच्या धोकादायक फांद्या काढाव्यात, शहरात वाहतूक वाढली असून वाहतुकीतील अडथळे दूर करावेत. रस्ता मोकळा करावा. याशिवाय तालुक्यातील स्थलांतरित शाळांमध्ये विजेची जोडणी करावी, अशाप्रकारे आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक साधने व साहित्य यांचे नियोजन करण्याबाबत सूचना करून नियोजन करताना काही अडचणी येत असतील तर माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

तहसीलदार अनंत गुरव म्हणाले, नैसर्गिक आपत्ती पार्श्वभूमीवर पाटण तहसील कार्यालयात चोवीस तास आपत्ती निवारण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. याद्वारे तालुक्यातील घटनांची माहिती मिळणार आहे. आपत्ती येण्यापूर्वीच काही उपाययोजना राबविता येतात का? ते पहावे. यासाठी आपत्तीपूर्व नियोजन करणे गरजेचे आहे. गतवर्षी पूरपरिस्थितीत प्रशासनाने चांगली तयारी केली होती. याही वर्षी परिस्थिती उद्भवू नये यासाठी आपण दक्ष राहून समन्वयाने काम करावे, असे आवाहन केले.

बैठकीत कोयना जलसिंचन विभागामार्फत पूरपरिस्थिती नियोजनाबाबत आढावा देण्यात आला. तसेच कोयना धरणावरही पूर नियंत्रण कक्ष स्थापन केला असून तो १ जूनपासून कार्यरत होईल, अशी माहिती कार्यकारी अभियंता नीतेश पोतदार यांनी दिली. यावेळी आरोग्य विभाग, वीज वितरण कंपनी, शिक्षण, बांधकाम, पशुधन, कृषी, पोलीस आदी विभागांचा आढावा घेण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी गोरख शेलार यांनीही मार्गदर्शन केले. बैठकीस सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.